# माहिती पत्रक

- विद्यार्थी उत्कर्ष मंडळाची स्थापना १ एप्रिल १९५४ रोजी वर्ष प्रतिपदेच्या शुभमुहूर्तावर झाली.
- संस्था पब्लिक ट्रस्ट कायद्याखाली नोंदविण्यात आलेली असून विहित घटनेनुसार तिचा कारभार चालतो.
- इ. ४ थी आणि त्यावरील कोणत्याही इयत्तेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांस या मंडळाचा सदस्य होता येते आणि विद्यार्थीदशा संपली तरीही सदस्यत्व कायम राहते.
- सध्या मंडळाचे कार्य चिंचपोकळी, लालबाग, सातरस्ता, भायखळा, ना. म. जोशी मार्ग या विभागात आहे. तसेच विभागाबाहेर राहणाऱ्या विद्यार्थ्यांसही सभासद होता येते.
- संस्थेचा कारभार विद्यार्थ्यांकडूनच त्यांच्या सर्वांगिण विकासासाठी परंतू पक्ष, जात किंवा धर्म निरपेक्ष दृष्टिकोनातून चालविला जातो.
- मंडळाचे मंडळ प्रमुख, उप मंडळ प्रमुख व सह मंडळ प्रमुख यांची निवड घटनेत नमूद केलेली सभासद करतात व ते आपणाला हवे असलेले सहकारी निवडून कार्यकारी मंडळ बनवितात. मंडळाच्या सर्व कार्यक्रमांचे नियोजन कार्यकारी मंडळ करते. कार्यकारी मंडळाचे सर्व निर्णय सभासदांवर बंधनकारक असतात.
- वर्षभरात होणाऱ्या सर्व कार्यक्रमात सभासदांनी हजर होणे आवश्यक आहे.
- संस्थेचा आर्थिक कार्यक्रम सभादांचे पालक, सभासद, हितचिंतक, जाहिरातदार, अनुदान ह्या देणगीतून घडविले जातात. मंडळनिधी हा कार्यक्रम वर्षात एकदा होतो.
- प्रतिवर्षी होणाऱ्या मंडळनिधी कार्यक्रमात सभासदांनी यथाशक्ती आर्थिक सहभाग घ्यावा असे मंडळास अपेक्षित आहे.
- आजमितीस संस्थेचे १०,००० हून अधिक सभासद आहेत.
- केवळ १ रूपयात आजीव सभासदत्व देणारी एकमेव संस्था.